सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/०००९३८**

**अपिलार्थी श्री. श्रीहरी दत्तात्रय लोमटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ०५ वा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ०५ वा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०९.२०२१**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०१.२०२० | २९.०१.२०२० | २०.०२.२०२० | १७.०३.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०४.०६.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे:

१) माहिती अधिकारातील कलमांचा चुकीचा अर्थ लावून पोलीस महासंचालक यांनी माहिती दिली नाही.
२) सदर प्रकरणात मी प्रथम पासून मुळ अर्जदार असल्याने आगंतूक हस्तक्षेप केलेला अर्जदार व माहिती मागणीचा सार्वजनिक हिताशी कोणताही संबंध नाही हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे चुकीचे आहे.
३) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा नं. २,३,४ बाबत दि. १७.०३.२०२० चे आदेशात काहीच नमूद केलेले नाही.
४) जन माहिती अधिकारी यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या क्रिमीनल अपील नं.१३२९/२००९ आदेश दि.१५.०२.२०१५ च्या निर्णयाचा अनादर झोलेला नाही हे दाखल केलेले म्हणणे एकतर्फी ग्राहय धरता येत नाही.

त्यासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि.२९.०१.२०२० व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.१७.०३.२०२० संलग्न केलेले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १४.०१.२०२० च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

१) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील क्रिमिनल अपील नं. १३२९/२००९ निर्णय दि.१६.१२.२०१५ नुसार श्री. ब्रिजलाल सदासुख मोदानी यांचे चौकशी प्रकरणातील अहवालाबाबत

२) मी स्वत: वरील चौकशी प्रकरणी आपले उस्मानाबाद येथील कार्यालयांस वेळोवेळी कागदपत्रांसह पुराव्यानिशी पाठपुरावा केलेला पक्षकार असून श्री. बी. एस. मोदानी यांचे झलेल्या चौकशीच्या अहवालाची संपूर्ण कागदपत्रासह छायांकीत प्रत प्रमाणित करुन मिळणेबाबत.

३) वरील चौकशी मध्ये पोलीस उप अधिक्षक उस्मानाबाद यांनी दिलेल्या चौकशी अहवालाची संपूर्ण कागदपत्रांसह छायांकीत प्रत.

४) मा. पोलीस अधिक्षक साहेब औरंगाबाद परिक्षेत्र यांनी दिलेल्या चौकशी अहवालाची संपूर्ण कागदपत्रासह छायांकीत प्रत.

५) या प्रकरणी सद्यस्थिती काय आहे या बाबतची माहिती.

६) मा. पोलीस पहासंचालक कार्यालयाने सदर चौकशीबाबत पुढे पत्र व्यवहार केला असेल तर कोणत्या कार्यालयाशी केला याबाबतच्या संपूर्ण कागदपत्राच्या छायांकीत प्रती मिळणे.

३. वरील माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०१.२०२० च्या पत्रान्वये अपिलार्थीस अर्जातील १ ते ६ मुद्दांना अनुसरुन एकत्रितपणे पुढीलप्रमाणे उत्तर कळविले आहे:

"सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांची उघड चौकशी अपसंपदेबाबतची असून त्यामध्ये त्यांना त्यांच्या मालमत्तेची माहिती विश्वासपूर्वक कागदपत्रांच्या आधारे सादर केलेली आहे.

आपण मागितलेली माहिती ही गैरअर्जदार यांनी विश्वासाने सादर केलेली त्यांच्या मालमत्तेसंदर्भात असून तिचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी संबंध नाही.

सदरची माहिती सादर केल्याने त्यांच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्य असल्याने व गैरअर्जदार हे सदर प्रकरणातल त्रयस्थ इसम असल्याने त्यांनी सादर केलेली माहिती, आपणांस माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(ड) व ८(१)(ञ) अन्वये नाकारण्यात येत आहे."

४. अपिलार्थीच्या दि. २०.०२.२०२० च्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७.०३.२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे :-

- अपील करण्याचे प्रयोजन :- मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील क्रिमीनल अपील नं.१३२९/२००९ निर्णय दि.१६.१२.२०१५ नुसार ब्रिजलाल सदासुख मोदनी यांचे प्रकरणाची चौकशी व कार्यवाही झाली नाही. या प्रकरणातील मी मुळ तक्रारदार व दि.०३.०५.२०१७, २२.०५.२०१७, ०१.०७.२०१७, १२.०७.२०१७, २१.०७.२०१७, ०३.०८.२०१७, १६.०८.२०१७, १३.०९.२०१७, १०.१०.२०१७, २७.११.२०१७, ०२.०१.२०१८ रोजी यांचे स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती संबंधितांना चौकशीसाठी दिलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात मी आगंतूक हस्तक्षेप केलेला गैरअर्जदार नसून माहिती अधिकारात दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय डावलून त्यांचे परस्पर सदरील प्रकरण दडवून टाकण्यात आलेले आहे. त्यामूळे माहिती मिळणे आवश्यक आहे.

- जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे :-श्री. महेश बागवे, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.,म.रा.,मुंबई व श्री.गिरीश गोडे, वाचक पोलीस उप अधिक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र हे उपस्थित असून त्यांनी अपिलार्थी यांच्या उपरोक्त नमूद मुद्दांनुसार खालीलप्रमाणे स्पष्टीकरण सादर केले आहे :-

१. प्रस्तुत प्रकरणातील इसम गै.अ.श्री.मोदानी हे असून त्यांनी सदर प्रकरणी सादर केलेली माहिती ही विश्वास दर्शवून सादर केलेली आहे. सदर माहिती ही त्यांचे स्थावर व जंगम मालमत्तेच्या संदर्भातील असून ती वैयक्तिक आहे. ती प्रकट करण्याचा सार्वजनिक हिताशी कोणताही संबंध नाही.

२. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अदा केल्यास गै.अ.श्री.मोदानी यांच्या खाजगीबाबतीत आगंतूक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. प्रकरणाची सद्य:स्थिती सदर प्रकरण हे ला.प्र.वि.मार्फत चौकशी होवून दि.२७.०७.२०१८ रोजी मा. महासंचालक, ला.प्र.वि.,म.रा.,मुंबई यांचे आदेशान्वये बंद करण्यात आले आहे.

४. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि.१५.१२.२०१५ रोजी क्रिमीनल अपील नं.१३२९/२००९ यामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयातील पॅरा क्र.२२ मध्ये खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"In View of the aforesaid premises, we allow the appeal, set aside the judgment and order passed by the High Court and direct that the issue i.e. whether the respondent is a public servant or not, shall be gone into during the trial."

सदर न्यायनिर्णयाचे वाचन व अवलोकन करता मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा / आदेशाचा कोणताही अनादन करण्यात आलेला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अनादर केलेला असल्यामुळे चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत माहिती अधिकारात देणेबाबत "माहिती अधिकार अधिनियम, २००५" मध्ये कोठेही नमूद करण्यात आलेले नाही.

अपिलार्थी यांचा अपील अर्ज तसेच त्यांनी केलेले तोंडी व लेखी निवेदन आणि जन माहिती अधिकारी यांचा अहवाल व वस्तुस्थिती अभ्यासुन गुणवत्तेच्या आधारे खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे :-

सदर अपीलाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी केलेले तोंडी व लेखी निवेदन तसेच जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी केलेले लेखी व तोंडी निवेदन विचारात घेण्यात आले.

आदेश

अपिलार्थी यांनी केलेल्या अपील अर्जामध्ये असा आदेश देण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचे माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र.५ व ६ ची माहिती ही त्यांना सुधारित उत्तराने पुरविण्यात यावी.

सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

५. सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी असे विषद केले की, या प्रकरणात मी स्वत: मुळ तक्रारकर्ता असून माझ्याच तक्रारीच्या अनुषंगाने गैरअर्जदाराची लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात आली आहे. परंतु, सदर चौकशी योग्यरित्या होत नाही. म्हणून गैरअर्जदाराच्या संदर्भात केलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना देण्यात यावी.

तसेच, त्यांनी दि.२८.०९.२०२१ च्या पत्रान्वये लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यात प्रामुख्याने पुढीलप्रमाणे युक्तीवाद केला आहे :-

..४/-

सदर प्रकरणात मी, प्रथम तक्रारदार असल्यामुळे काय चौकशी झाली याबाबत विचारणा केली होती व चौकशी अहवाल मागितला होता. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी गैरअर्जदार यांच्या मालमत्ता चौकशी प्रकरणातील अहवाल व माहिती देण्यास नकार दिला आहे.

प्रथम अपीलाची सुनावणी झाली परंतु या प्रकरणातील आरोपी गैरअर्जदार यांची स्थावर व जंगम मालमत्ता ही वैयक्तिक असून ती प्रकट करता येणार नाही व सदर स्थावर मालमत्तेच्या माहितीचा सार्वजनिक हिताशी संबंध नाही असे म्हणून मला मागितलेली माहिती देण्यात आलेली नाही. तपास करणाऱ्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनीच त्याचा बचाव केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

या प्रकरणातील गैरअर्जदार यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करुन / भ्रष्ट मार्गाचा वापर करुन स्थावर व जंगम मालमत्ता जमा केलेली आहे. या मालमत्तेची कागदपत्रे मी स्वत: ला.लु.प्र.विभागाच्या चौकशी यंत्रणेकडे दाखल केली होती. सदर चौकशी चालू असतांना आरोपी गैरअर्जदार यांनी मी लोकसेवक नसल्यामुळे चौकशी थांबवावी म्हणून मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली व ते लोकसेवक होत नाहीत असे म्हणून आदेश झाला.

सदर उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द पोलीस उप अधिक्षक, ला.लु.प्र.विभाग, उस्मानाबाद यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात क्रिमिनल अपील नं.१३२९/२००९ दाखल केली. त्याचा निर्णय दि. १५.१२.२०१५ रोजी झाला असून त्यात पुढील आदेश झालेला आहे.

"In View of the aforesaid premises, we allow the appeal, set aside the judgment and order passed by the High Court and direct that the issue i.e. whether the respondent is a public servant or not, shall be gone into during the trial."

सदर आदेश अवलोकन केले असता पोलीस महासंचालक, ला.लु.प्र.विभाग यांना चौकशी बंद करता येत नाही हे प्रथमदर्शनी दिसून येते.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निकालाप्रमाणे आरोपी हा लोकसेवक आहे का नाही, हे न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यावर सुनावणी दरम्यान (During the trial) निश्चित करण्यात येईल. याचा अर्थ ला.लु.प्र.विभागाला मी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणे बंधनकारक आहे. तसेच, सदरची चौकशी बंद करता येत नाही असे असतांना देखिल चौकशी बंद केली तर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होतो. म्हणून, माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सर्व कागदपत्रे, चौकशी अहवाल मिळणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. माझे अपील मंजूर करावे ही विनंती.

६. सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे विषद केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षकार यांनी चौकशीकामी विश्वासाने सादर केलेली असून ती त्यांची वैयक्तिक माहिती आहे. अशी वैयक्तिक माहिती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हील अपील नं.१००४४/२०१० केंद्रीय जन माहिती अधिकारी सर्वोच्च न्यायालय विरुध्द सुभाषचंद्र अगरवाल आदेश दि.१३.११.२०१९ मधील अभिप्रायानुसार मालमत्तेसंबंधीची माहिती ही वैयक्तिक माहिती ठरते. म्हणून अधिनियमाच्या कलम ८(१)(ड) व ८(१)(ञ) अन्वये माहिती नाकारण्यात आली आहे.

तसेच अपिलार्थी यांनी द्वितीय अपीलामध्ये अपीलाची कारणे म्हणून उपस्थित केलेल्या मुद्दांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०९.२०२१ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे लेखी म्हणणे / युक्तीवाद सादर केलेला आहे :-

१) सदर प्रकरणामध्ये गैर अर्जदार यांची उघड चौकशी अपसंपदेबाबतची असून त्यामध्ये त्यांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती विश्वासपूर्वक कागदपत्रांच्या आधारे सादर केलेली असून ती वैयक्तिक आहे.

२) अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही गै.अ. यांनी विश्वासाने सादर केलेली त्यांच्या मालमत्तेसंदर्भात असून तिचा कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंध नाही.

३) सदरची माहिती सादर केल्याने त्यांच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे व सदर प्रकरणातील गैरअर्जदार हे त्रयस्थ इसम असल्याने सदरची माहिती नाकारण्यात आलेली आहे.

४) दि.१७.०३.२०२० रोजीच्या प्रथम अपील आदेशात माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (ड), ८ (१) (त्र) मधील तरतुदीनुसार माहिती नाकारण्यात आलेली आहे.

Section 8 (1) (i) :- Information which relates to personal information the disclosure of which has no relationship to any public activity or interest, or which would cause unwarranted invasion of the privacy of the individual unless the Central Public Information Officer or the State Public Information officer or the appellate authority, as the case may be, is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information.

५) सदर गुन्ह्यामधील आलोसे, श्री.बी.एम.मोदानी यांनी ला.प्र.वि. उस्मानाबाद या कार्यालयामध्ये उपस्थित होवून दिलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांची व्यक्तिगत माहिती इतर कोणासही देण्यात येवू नये याबाबत नमूद केले आहे.

६) मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि.१५.१२.२०१५ रोजी क्रिमिनल अपील नं.१३२९/२००९ यामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा अनादर झालेला नाही.

सदरची माहिती गैर अ. श्री. ब्रिजलाल स मोदानी यांची वैयक्तिक माहिती असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ (१) (j) व सर्वोच्च न्यायालाचे Civil Appeal No.10044 of 2010 titled in Central Public Information Officer, supreme Court of India Vs subhas Chandra Agarwal-Regarding Right to Information Act-2005 dated 13.11.2019 रोजीच्या निर्णयान्वये नाकारण्यात येत आहे.

७) सबब, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (ड), ८ (१) (त्र) अन्वये माहिती देण्याचे नाकारण्यात येत आहे.

७. या अपिलासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच लेखी व तोंडी युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.१४.०१.२०२० च्या माहिती अर्जान्वये वरील परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जात नमूद १ ते ६ मुद्दांन्वये माहितीची मागणी केली होती. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि.२९.०१.२०२० च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे.

तसेच प्रथम अपिलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेद क्र. ४ प्रमाणे सविस्तर कारणमिमांसा देऊन दि. १७.०३.२०२० रोजी प्रथम अपील निकाली काढले आहे.

एकंदरीत या प्रकरणात अपिलार्थी यांनी गैरअर्जदार यांच्या स्थावर व जंगम मालमत्ताबाबत (अपसंपदेबाबत) त्यांनी ला.लु.प्र.विभागाकडे स्वत: केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा / चौकशी अहवालाची संपूर्ण कागदपत्रांसह माहिती मागितली आहे. तसेच, याच संदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयातील क्रिमीनल अपील नं.१३२९/२००९, आदेश दि.१५.१२.२०१५च्या अनुषंगाने न्यायालयीन प्रक्रिया सुरु असतांनाही संबंधित विभागाने सदर चौकशीची कार्यवाही बंद केली आहे म्हणून प्रकरणाची सद्य:स्थिती

..६/-

काय आहे याची माहिती मागितली आहे. परंतु, अपिलार्थींनी मागितलेली माहिती ही गैरअर्जदार यांच्या मालमत्तेसंदर्भातील वैयक्तिक माहिती असल्याने व गैरअर्जदार यांनी सदर माहिती इतर कोणास देण्यात येवू नये असे लेखी कळविलेले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ८ (१) (ड) व (त्र) अन्वये अपिलार्थीस माहिती नाकारली आहे.

अपीलार्थींनी ज्या चौकशी अहवालाची माहिती मागितली आहे त्या प्रकरणाशी संबंधित बाब मा. सर्वोच्च न्यायालयात क्रिमिनल अपील नं.१३२९/२००९ अन्वये दाखल केली असून, याबाबत मा. न्यायालयाने दि. १५.१२.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयात पुढील अभिप्राय दिले आहेत :-

"In View of the aforesaid premises, we allow the appeal, set aside the judgment and order passed by the High Court and direct that the issue i.e. whether the respondent is a public servant or not, shall be gone into during the trial."

वरील न्यायालयीन अभिप्राय लक्षात घेता, अपिलार्थींनी ज्या गैरअर्जदार व्यक्तीच्या मालमत्तेच्या चौकशीसंदर्भातील अहवाल व अन्य कागदपत्रे मागितली आहेत ती बाब सध्या न्यायप्रविष्ट असल्याचे दिसून येते. तसेच, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही गैरअर्जदार / त्रयस्थ पक्षकार यांनी ला.लु.प्र.विभागाकडे चौकशीकामी विश्वासाने सादर केलेली असून ती त्यांची वैयक्तिक माहिती आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने Civil Appeal No.10044 of 2010, C.P.I.O., Suprime Court of India V/s Subhash chandra Agarwal या प्रकरणात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

**Para -59 :-** "Reading of the aforesaid judicial precedents, in our opinion, would indicate that personal records, including name, address, physical, mental and psychological status, marks obtained, grades and answer sheets, are all treated as personal information. Similarly, professional records, including qualification, performance, evaluation reports, ACRs, disciplinary proceedings, etc are all personal information, medical records treatment, choice of medicine, list of hospitals and doctors visited, findings recorded. including that of the family members, **information relating to assets, liabilities, income tax returns, details of investments, lending and borrowing, etc are personal information such personal information is entitled to protection from unwarranted invasion of private and conditional access is available when stipulation of larger public interest is satisfied**. This list is indicative and not exhaustive"

वरील न्यायालयीन अभिप्राय लक्षात घेता माहिती अधिकारांतर्गत मालमत्ता विषय वैयक्तिक माहिती व्यापक सार्वजनिक हित सिध्द झाल्याशिवाय देता येत नाही.

याशिवाय मा. सर्वोच्च न्यायालयातील क्रिमिनल अपील नं.१३२९/२००९ संदर्भातील दि.१५.१२.२०१५ च्या आदेशाचा अवमान झाला आहे व गैर अर्जदाराच्या विरोधातील तक्रारींच्या अनुषंगाने सुरु असलेली चौकशीची कार्यवाही बंद करता येत नाही हे अपिलार्थींचे आक्षेप माहिती अधिकार अधिनियमाच्या व माहिती आयोगाच्या कार्यकक्षे बाहेरील असल्याने त्याबाबत माहिती आयोग कोणतेही भाष्य करु शकत नाही.

वरील विवेचन लक्षात घेता, या प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**उपरोक्त विवेचन लक्षात घेता अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १५.०३.२०२२**